**नियमित दिवाणी दावा क्र-३९/२०१७**

**निशाणी ३४ लगत**

**वादीचा जादा सरतपास शपथेवर विधीज्ञ श्री. बी. आर. चौधरी यांचेतर्फे सुरु -**

निशाणी ३/१ सोबत दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. त्यास **निशाणी क्र.३६** देण्यात आली. प्रतिवादी यांनी माझे वडिलांना दावा मिळकतीबाबतचे साठेखत लिहून दिले होते. ते अस्सल साठेखत निशाणी ३३/१ सोबत दाखल केलेले आहे. ते आता मला दाखविण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर लिहून देणार म्हणून प्रतिवादीने सही केलेली आहे. ती मी ओळखतो. माझे वडील मयत आहेत. सदर साठेखत दि.१९/११/१९९३ रोजीचे आहे. त्यास **निशाणी क्र.३७** देण्यात आली. माझे वडिलांनी वकीलांमार्फत प्रतिवादीस दावा दाखल करण्यापूर्वी नोटीस पाठविली होती व सदर नोटीसीस प्रतिवादीने दिलेले उत्तर निशाणी ३/३ वर दाखल केले आहे. त्यास **निशाणी क्र.३८** देण्यात आली.

**जादा सरतपास – पुर्ण.**

**प्रतिवादी व वकील पुकारता गैरहजर. सबब, उलटतपास नाही.**

**फेरतपास - नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Sd/-

(जे.एम.अग्निहोत्री)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
नांदगाव
दि. १२/०८/२०२५

माझे समक्ष,

Sd/-

(जे.एम.अग्निहोत्री)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
नांदगाव